# आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालय

वाचले: या कार्यालयाचे सम क्रमांकाचे दि.२३.२.२००७चे परिपत्रक.

## परिपत्रक

विषय: देशी / विदेशी मद्य निर्मिती करताना
साखरेच्या द्रावणाचा वापर करण्याबाबत..

----------

क्र.सीएलआर.११२००५/४७८६७/५-ब                    मुंबई, १० मे २००७.

या कार्यालयीन परिपत्रक दि.२३.२.२००७ अन्वये देशी / विदेशी मद्य निर्मिती करताना साखरेच्या द्रावणाचा वापर करु नये अशा सूचना निर्गमित करण्यात आल्या होत्या. या संदर्भात काही मद्य निर्माणी घटकांनी निवेदने देऊन साखरेच्या द्रावणाचा वापर केल्यास मद्याच्या तीव्रतेमध्ये फरक येत नाही. परंतु हायड्रोमीटर व थर्मामीटर पध्दतीने मद्याची तीव्रता पाहिली असता मद्याच्या घनतेमध्ये वाढ होत असल्यामुळे तीव्रता कमी दाखविली जाते. परंतु उर्ध्वपतन (distillation) पध्दतीने तीव्रता तपासली असता साखरेच्या द्रावणामुळे तीव्रतेमध्ये फरक होत नाही अशी निवेदने दिली होती.

२. साखरेचे द्रावण मिसळल्यामुळे मद्याच्या तीव्रतेत बदल होतो का? ही बाब तांत्रिक स्वरुपाची असल्याने या संदर्भात संचालक, हाफकीन प्रशिक्षण, संशोधन व चाचणी संस्था, मुंबई यांना याबाबत सविस्तर विचारणा करण्यात आलेली होती. या संदर्भात सदरील हाफकीन संस्थेने दि.२९.३.२००७ रोजी याबाबतचा अहवाल सादर केला. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मद्यात साखर टाकल्यामुळे साधारणत: चवीत बदल होतो व मद्याची घनता वाढते. डिस्टीलेशन पध्दतीने अशा साखरेच्या द्रावणयुक्त मद्याचे विश्लेषण केले असता मद्याच्या तीव्रतेत फरक आढळून येत नाही. परंतु हायड्रोमीटर पध्दतीने विश्लेषण केल्यास ०.२ टक्के साखर टाकल्यास ०.५ यु.पी, ०.५ टक्के साखर टाकल्यास १.४ यु.पी आणि १ टक्का साखर टाकल्यास ३.४ यु.पी. तीव्रतेचा फरक आढळून येतो.

३. हाफकीन संस्थेच्या या पत्रावर या विभागातील अधीक्षक / उप आयुक्तांच्या दि.३०.४.२००७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सविस्तर चर्चा झालेली होती. हाफकीन संस्थेने

दिलेल्या अहवालात साखर किती प्रमाणात वापरल्यास व अशा मद्याचे हायड्रोमीटीर पध्दतीने विश्लेषण केल्यास त्याची तीव्रता किती यु.पी.ने कमी होते ही बाब स्पष्ट केलेली आहे. हाफकीन संस्थेचा अहवाल व बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने देशी / विदेशी मद्यामध्ये ०.५ टक्के साखर टाकल्यास त्याची तीव्रता हायड्रोमीटर पध्दतीने १.४ यु.पी.ने कमी होते. देशी / विदेशी मद्य निर्माण करतेवेळेस घटकांना lower sideला २ यु.पी. कमी म्हणजे २७ यु.पी. पर्यंतचा मद्याचा फरक ग्राह्य धरण्यास या पूर्वीच या कार्यालयाने निर्गमित केलेल्या परिपत्रकात स्पष्ट केलेले आहे.

४. वरील सर्व बाबी विचारात घेता देशी / विदेशी मद्याच्या तीव्रतेमधील २ यु.पी.चा फरक(Allowable Tolerance Limit) विचारात घेऊन तसेच हाफकीन इन्स्टिट्यूटचा तांत्रिक अहवाल पाहता व सभेत ठरलेल्या निर्णयानुसार या कार्यालयाचे परिपत्रक क्र.सीएलआर.११२००५/४७८६७/५-ब दि.२३.२.२००७ रद्द करुन आता असे सूचित करण्यात येते की, घटकास देशी / विदेशी मद्य निर्मितीवेळेस जास्तीत जास्त ०.५ टक्के साखरेचे द्रावण वापरता येईल त्यामुळे हायड्रोमीटर पध्दतीने मद्याचे विश्लेषण केल्यास तीव्रतेमध्ये १.४ यु.पी. इतका फरक पडेल आणि सदरील फरक हा त्यांना विहीत केलेल्या मर्यादेपर्यंत म्हणजे २७ यु.पी.च्या आत राहील. तरी जे घटक साखरेचे द्रावण मद्य निर्मितीमध्ये वापरु इच्छितात अशा घटकांनी साखरेचे प्रमाण ०.५ टक्क्यांपेक्षा जास्त वापरण्यात येऊ नये तसेच डिस्टिलेशन पध्दतीने मद्याची तीव्रता तपासली असता ती २५ यु.पी. इतकीच राहील याची जबाबदारी घटकावर राहील. मात्र ०.५ % पेक्षा जास्त प्रमाणात साखरेच्या द्रावणाचा वापर केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित घटकाविरुध्द नियमभंगाची कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

(सी.एस.संगीतराव)
आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रति

१. सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क.
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क.
३. सर्व देशी / विदेशी मद्य निर्माण्या व त्यावरील प्रभारी अधिकारी.
४. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
५. अभिलेख शाखा(५ प्रती)

आ - sugar syrup